## अट्ठमो पाठो ।

# सागल वण्णना ।

पालि-वाङ्मयातील एक अत्यंत लोकप्रिय ग्रंथ म्हणजे 'मिलिन्दपञ्हो' (मिलिंद प्रश्न) हा होय. या ग्रंथात बॅक्टिअन राजा ग्रीक देशाचा मिनॅन्डर (सुमारे इ.स. पूर्व २रे शतक) व बौद्ध भिक्खू नागसेन यांचा प्रश्नोत्तरोत्तम संवाद आहे. इ.स. पूर्वच्या पहिल्या शतकात या ग्रंथाची रचना झाली असावी. मिलिन्द राजाच्या सागलनगर या राजधानीच्या वर्णनाने ग्रंथाला आरंभ होतो. सागल (सियालकोट) वर्तमान पाकिस्तानातील एक शहर. देशाच्या विभाजनापूर्वी ते भारतात होते. या वर्णनात अनेक मनोरंजक उल्लेख आलेले आहेत. त्यातील नगर-रचना, व्यापारी लोक, नगरवासी यांविषयीचे उल्लेख विशेष लक्षणीय आहेत.

---

अत्थि योनकानं नानापुटभेदन सागलं नाम नगरं नदी पब्बत सोभितं रमणीय भूमिभाग नदीपब्बतेहि सोभितं, आरामेहि, उय्यानुपवनेहि, तळाकेहि, पोक्खरणीहि च सम्पन्नं । सुतवन्ते हि तं तथा निम्मितं यथा विविधेहि दळ्हेहि च — अट्टालकोट्ठकेहि गम्भीराय परिखाय पण्डरेन पाकारेन तं सुरक्खितं होति । तेन सब्बे पच्चअत्थिका च पच्चामित्ता च निहता । तस्स वीथियो चतुक्कसिङ्घाटकेहि तं नगरं सुविभत्तं करोन्ति । सुप्पसारितेहि अनेकविधेहि वरभण्डेहि परिपूरितानि आपणानि, हिमगिरिसिखरसदिसा निसतसहस्सानि वरभवनानि, वरगोपुरानि च तस्स नगरस्स मण्डनानि । गज - हय - रथ - पत्तिसमाकुलं तं नगरं बहुन्नं जनानं पियंमनापं च — अभिरूपेहि नर-नारी-गणेहि अनुचरितं, बहुविधेहि विञ्ञावन्तेहि निसेवितं, खत्तियब्राह्मणादीहि नेकविधेहि जनेहि तं सब्बेन सब्बदा आकिण्णं । विविधेहि समण-ब्राह्मणादीहि सभाजनेहि तं सङ्कटितं । कासिक-कोटुम्बरकादीहि वत्थेहि संपन्नानि तस्स वत्थापणानि । बहुविधेहि रुचिरेहि सुप्पससारितेहि पुप्फेहि च गन्धेहि सुगन्धीनि तस्स वीथिचतुक्कानि । रतनापणेसु विज्जमानेहि आसंसनीयेहि रतनेहि विज्जोतिता तस्स रथिया । सिङ्गारवणिजगणा तत्थ निच्च विचरन्ति । रजतसुवण्ण - परिपूरं कहापण - कंसपत्थर संपन्नं, पज्जोतामन - निधि - निकेतं, पहुत-धन-धञ्ञं, परिपुण्ण-कोसं, बहु-अन्नपान, खज्ज-भोज्ज - समिद्धं, सम्पन्नसस्सं, उत्तरकुरू - सकासं सागलनगरं आळकमन्दा विय देवपुरं ।

### सद्दत्थ (शब्दार्थ)

योनक (पुं.) - यवन IONIAN GREEK
सोभित (वि.) - शोभविलेले
पोक्खरणी (स्त्री.) - कमळाचे छोटे कृत्रिम तळे
सुतवन्त (वि.) - ज्ञान असलेला, विद्वान
अट्टाल (पुं.) - पहाऱ्यासाठी उभारलेला मनोरा
गम्भीर (वि.) - खोल
पण्डर (वि.) - पांढरा
पच्चअत्थिक (पुं.) - प्रतिस्पर्धी
निहत (वि.) - परतविलेला
चतुक्क - चौक
सु-विभत्त (वि.) - चांगल्या प्रकारे विभागलेले
वर-भण्ड (नपुं.) - विक्रीचा उत्तम माल

भूमि-भाग (पुं.) - प्रदेश
आराम (पुं.) - उद्यान
निम्मित (वि.) - निर्माण केलेले
दळ्ह (वि.) - भक्कम
कोट्ठक (नपुं.) - कोठार
परिखा (स्त्री.) - खंदक
पाकार (पुं.) - तटबंदी
पच्चामित्त (पुं.) - शत्रू
वीथि (स्त्री.) - रस्ता
सिङ्घाटक (पुं.) - चौक
सुप्पसारित (वि.) - चांगल्या प्रकारे मांडलेले
आपण (नपुं.) - दुकान

**हिम-गिरि-सिखर-सदिस** (वि.) - हिमालय पर्वताच्या शिखरासारखा
**हय** (पुं.) - घोडा
**समाकुल** (वि.) - गजबजलेले
**निसेवित** (वि.) - ज्याचा आश्रय घेतला आहे असा
**सब्बेन सब्बदा** - सर्वप्रकारे (वाक्यप्रयोग)
**सङ्घटित** - बनलेला
**कोटुम्बरक** (वि.) - कोटुम्बर नावाच्या प्रदेशात तयार झालेले वस्त्र
**आसंसनीय** (वि.) - ज्याची अभिलाषा, इच्छा करावी असा
**सिङ्गार वणिज** (पुं.) - काजळ, कंगवे इत्यादी शृंगाराची साधने विकणारा व्यापारी
**पज्जोतमान** (वि.) - चमकणारा
**परिपुण्णकोस** - ज्याचा खजिना भरलेला आहे असा
**समिद्ध** (वि.) - संपन्न
**वरभवन** (नपुं.) - उत्तम निवासस्थान
**वरगोपुर** (नपुं.) - सुंदर प्रवेशद्वार
**पत्ति** (पुं.) - पादचारी सैनिक
**अनुचरित** (वि.) - वावर असलेला
**विञ्ञावन्त** (वि.) - विद्वान
**आकिण्ण** (वि.) - भरलेला
**कासिक** (वि.) - काशीमध्ये तयार झालेले (वस्त्र)
**वत्थापण** (नपुं.) - वस्त्राचे दुकान
**रुचिर** (वि.) - सुंदर
**विज्जोतित** - उजळलेला, प्रकाशमान केलेला
**कहापण** (पुं.) - सोन्याचे नाणे
**कंसपत्थर** (पुं.) - काशाचा पत्रा
**निधि-निकेत** (पुं.) - खजिना, घर
**खज्ज** (नपुं.) - खाण्याचे पदार्थ
**देवपुर** (नपुं.) - देवांचे नगर

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) मिलिंदराजा कोणत्या देशाचा रहिवासी होता ?
(२) नागसेन कोण होता ?
(३) राजा मिलिंद व भन्ते नागसेन ह्यांच्या संवादाच्या ग्रंथाचे नाव काय ?
(४) सागलनगर 'बहुमूल्य रत्नांचे चमकते कोषागार' असे का म्हटले आहे ते स्पष्ट करा.
(५) सागलनगर प्रतिभाशाली विद्वानांचे केंद्र होते असे का म्हटले आहे ?

**टिपणे**

- प्राचीन बौद्ध काळातील समृद्ध नगरांची माहिती देणे.
- प्राचीन सभ्यतेचा अभ्यास करणे.

★ ★ ★